# दैनिक अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

वर्ष : ०५ | अंक : ३७, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.२१ सप्टेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056



**आजचा सुविचार**

जो मनुष्य मरायला तयार होतो
तो कधीच मरत नाही...
आणि जो मरायला भितो
तो आधीच मेलेला असतो...
– डॉ. बाबासाहेब आंबेडकर


**आतील पानात**

- देवीच्या मारक रूपाची उपासना : काळाची गरज !
- लोणंद नगरपंचायतीत कोट्यवधींचा अपहार?
- आतापर्यंत गोट्या खेळत होता का? ही माणसं जर पिसाळली ना, तर..


## माळकौठ्यात क्षुल्लक कारणांवरून युवकाचा खून !




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२०, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड तालुक्यातील माळकौठा येथील क्षुल्लक कारणांवरून झालेल्या भांडणात तीक्ष्ण हत्याराने छातीवर वार करून गंभीर अवस्थेतील जखमी संजय हिरामण पवार यांचा उपचारादरम्यान दि.२० शनिवार सकाळी पाचच्या सुमारास मृत्यू झाला. या प्रकरणी खुणाचा गुन्हा दाखल करण्यात आला

मयतचे मामा संजय बाबुराव सोळंखे रा. इस्लापूर (ता.किनवट जि. नांदेड ) हल्ली मुक्काम माळकौठा ता. (मुदखेड )यांनी दिलेल्या फिर्यादी वरून दि.१९ शुक्रवार रोजी रात्री ८ : ३० वाजण्याच्या सुमारास रस्त्यावर कोळसा वाळत घालत असल्याच्या कारणावरून भांडण झाले. यावेळी आरोपी अमोल चांदु हनुमंते, रितेश साहेबराव हनुमंते रा. माळकौठा ता.(मुदखेड) या दोघांनी माधव संतुका पवार यांच्या दुकानासमोर संजय हिरामण पवार यांना जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने छातीवर हत्याराने वार केले. रक्ताच्या थारोळ्यातील गंभीर जखमी संजय हिरामण पवार यास उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

उपचारादरम्यान दि. २० शनिवार रोजी सकाळी ५ वाजण्याच्या सुमारास मृत्यू पावला आहे. या प्रकरणी अमोल चांदु हनुमंते, रितेश साहेबराव हनुमंते यांच्यावर खुणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक कांबळे करीत आहेत.

## किनवट तालुक्यात डेंगू-मलेरियाची साथ
### आरोग्य विभागाच्या दुर्लक्षामुळे नागरिक त्रस्त...



**अक्षराज : कैलास राठोड**

**दि.२०, किनवट (नांदेड) :** किनवट तालुका परिसरात शहर तसेच ग्रामीण भागात डेंगू व मलेरियाची साथ झपाट्याने पसरत असून प्रत्येक घराघरात ताप, खोकला, सर्दीची लक्षणे दिसून येत आहेत.गावांमध्ये व शहरात नाल्यांची स्वच्छता न झाल्यामुळे सांडपाणी साचून डासांची उत्पत्ती मोठ्या प्रमाणात होत आहे. यामुळे रोगराईचा प्रादुर्भाव वाढला असून नागरिक आरोग्य धोक्यात आले आहेत.दरम्यान आरोग्य विभागाकडून आवश्यक त्या उपाययोजना होत नसल्याची तक्रार नागरिक करत आहेत. लोकप्रतिनिधी मात्र आपल्या धुंदीत व्यस्त असल्याने परिस्थिती अधिकच गंभीर होत चालली आहे.नागरिकांनी तातडीने आरोग्य विभागाने प्रतिबंधात्मक मोहीम राबवावी, नाल्यांची साफसफाई करून फवारणी करावी, अशी मागणी केली आहे.

## अवैध वाळू वाहतुक करणाऱ्या वाहनांचा परवाना होणार निलंबित

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१९, ठाणे :** राज्यात मोठ्या प्रमाणात वाळू व इतर गौण खनिजांचे अनधिकृत उत्खनन, वापर, वाहतूक व तस्करीचे प्रकार वारंवार घडत असल्याचे निर्देनास येत आहे. महसुलाची तसेच पर्यावरणाची हानी टाळण्यासाठी तसेच अनधिकृतपणे वाहतूक करणाऱ्या वाहनांचा परवाना निलंबित करण्याचा निर्णय राज्य परिवहन प्राधिकरणाच्या बैठकीत घेण्यात आला आहे.

वाळू व इतर गौण खनिजांचे अनधिकृत उत्खनन करुन अवैधपणे वाहतूक करणाऱ्या वाहनांवर पहिल्या गुन्ह्यासाठी पुढील ३० दिवसापर्यंत परवाना निलंबित व वाहन अटकावून ठेवण्याची कारवाई करण्यात येत आहे. याच विषयाशी संबंधित दुसऱ्या गुन्ह्यासाठी पुढील ६० दिवसपर्यंत परवाना निलंबित व वाहन अटकावून ठेवण्यात येत आहे. तसेच याच संदर्भातील तिसऱ्या गुन्ह्यासाठी वाहन अटकाव करुन संबंधित प्रादेशिक परिवहन प्राधिकरणामार्फत परवाना रद्द करण्याची कारवाई करण्यात येणार आहे. मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम ११३ चा भंग करुन सकल भारक्षमतेपेक्षा (जीव्हीडब्ल्यु) अतिरिक्त वजनाच्या वाळू व इतर गौण खनिजांची मालाची वाहतुक करणाऱ्या परवानाधारकांवर विभागीय कारवाई करण्याचा निर्णय घेण्याचे अधिकार राज्य परिवहन प्राधिकरणास आहेत.

# उत्तर महाराष्ट्राला 'परतीचा' तडाखा !
## ५४ पैकी १६ तालुक्यांत पावसाचा कहर...



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२०, नाशिक :** उत्तर महाराष्ट्रातील पाचही जिल्ह्यांतील बहुतेक तालुक्यांत परतीच्या पावसाने दोन–तीन दिवसांपासून धुमाकूळ घातला असून, सोमवारी आणि मंगळवारी असे दोन दिवस नाशिक विभागातील ५४ पैकी १६ तालुक्यांना परतीच्या पावसाने जोरदार तडाखा दिला. या तालुक्यांत परतीच्या पावसाने दणका दिल्याने खरीप पिके भुईसपाट झाली. काही पिके शेतात पाणी साचून अक्षरशः सडली. विभागात ६ महसूल मंडळांत ढगफुटीसदृश पाऊस झाला. मुक्ताईनगर तालुक्यातील कुऱ्हा महसूल मंडळात विक्रमी ९५.७५ मिमी पाऊस कोसळल्याने या भागातील पिकांसह जमीन देखील खरडून वाहून गेली.

विभागात नाशिक जिल्ह्यात २, धुळे जिल्ह्यात ४.९, नंदुरबार जिल्ह्यात २.४, जळगाव जिल्ह्यात १६.३, तर अहिल्यानगर जिल्ह्यात ४.५ मिमी इतका पाऊस झाला.

गेल्या वर्षी आजपर्यंत १०८.७ टक्के म्हणजेच ६९७.५ मिमी इतका पाऊस झाला होता. मात्र, हा पाऊस सुरुवातीलाच झाला होता. परतीच्या पावसाचे प्रमाण कमी होते. चालू वर्षी मात्र परतीच्या पावसाने १६ तालुक्यांना तडाखा दिल्याने खरिपाच्या पिकांवर संक्रांत ओढवली. विभागातील येवला, त्र्यंबकेश्वर, नांदगाव, शिरपूर, शिंदखेडा, शहादा, नंदुरबार, जळगाव, भुसावळ, यावल, रावेर, मुक्ताईनगर, चोपडा, एरंडोल, जामनेर, पाचोरा, भडगाव, धरणगाव, बोदवड, पाथर्डी, नेवासा, राहुरी, राहुरी, संगमनेर, अकोला, श्रीरामपूर, राहता या तालुक्यांतील बहुतेक गावांत परतीच्या पावसाने धुमाकूळ घातला.

### जळगावात अतिवृष्टीचा कहर !

जळगाव : जिल्ह्यातील पाचोरा व जामनेर तालुक्यात सोमवारी रात्री झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकरी संकटात सापडले आहेत. या दोन्ही तालुक्यांमधील ४४ गावांमध्ये सुमारे ४ हजार ३२७ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे मोठे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. कृषी विभागाच्या अहवालानुसार, या अतिवृष्टीमध्ये कापूस आणि मक्याचे सर्वाधिक नुकसान झाले आहे. २,५२१ हेक्टरवरील कापूस पिके बाधित झाली आहेत, तर ९२४ हेक्टरवरील मक्याचे पीक खराब झाले आहे. त्याचबरोबर केळी बागांचेही नुकसान झाले. विभागातील जिल्हानिहाय पर्जन्यस्थिती (मिमीमध्ये)

**जिल्हा– सरासरी पाऊस– प्रत्यक्षातील पाऊस– सरासरीच्या टक्के**

नाशिक ---८५४.२ ---६४५.४ ---७५.६
धुळे ---४८७.७ ---४६२.४ ---९४.८
नंदुरबार --७९६.८ ---५७८.८ ---७२.६
जळगाव ---५७९ ---५५६.६ ---९६.१
अहिल्यानगर ---३८४.४ ---३७०.९ ---९६.५
एकूण ---६४१.५ ---५१८.१ ---८०.८

**ढगफुटी झालेली महसूल मंडळे (पाऊस मिमी)**

कुहा ---९५.७५
घोडसगाव ---७७.२५
सावदा ---६९.७५
खिर्डी ---६९.७५
मुक्ताईनगर ---६७
जामनेर ---६६.७५

# पारनेर राष्ट्रवादीत स्टेटस वॉर !
## आमदार दाते यांच्या 'बापजाद्या' उल्लेखाने झावरे समर्थक नाराज





**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२०, अहिल्यानगर :** पारनेर तालुक्याच्या राजकारणात मोठा वाद निर्माण झाला आहे. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत भांडण आता उघड झाले आहे. आमदार काशिनाथ दाते यांनी त्यांच्या व्हाट्सअॅप स्टेटसवर सुजित झावरे पाटील यांचा 'बापजाद्या' असा अपमानजनक उल्लेख केला. यामुळे सुजित झावरे यांचे समर्थक चांगलेच संतप्त झाले आहेत. त्यांनी आता आमदार दाते यांच्याशी कोणताही संबंध ठेवणार नसल्याची घोषणा केली आहे.

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत सुजित झावरे यांनी वैयक्तिक वैर विसरून दाते यांना आमदार होण्यासाठी मदत केली. टाकळी ढोकेश्वर आणि ढवळपुरी सारख्या भागात झावरे यांच्या ताकदीमुळे दाते यांना मोठे मताधिक्य मिळाले. पण निवडणुकीनंतर गेल्या चार महिन्यांपासून झावरे आणि त्यांच्या समर्थकांना पक्षात आणि सत्तेत डावलले जात आहे. कार्यक्रमांमध्ये त्यांना बोलावले जात नाही. त्यातच दाते यांनी शेतकरी पंथशाला यात्रेवरून झावरे यांच्यावर उपहासात्मक काव्य लिहिले आणि बाप जाद्या असा अपमान केला.या प्रकारामुळे झावरे समर्थक प्रचंड नाराज आहेत. ते म्हणतात, आम्ही दाते यांना आमदार केले, पण ते आम्हाला अपमानित करतात. आता त्यांच्याशी कोणताही संबंध ठेवणार नाही! यामुळे पारनेरच्या राजकारणात मोठी फूट पडली आहे. याचा परिणाम येणार्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांवर होऊ शकतो. झावरे समर्थक स्वतंत्र लढण्याची तयारी करत आहेत. अजित पवार यांना आता हस्तक्षेप करावा लागेल, नाहीतर पक्षाला मोठा फटका बसू शकतो. पारनेरचे राजकारण आता नवे वळण घेणार आहे.

> विधानसभा निवडणुकीत आम्ही सुजित झावरे पाटील यांच्या नेतृत्वाखाली उमेदवार म्हणून काशिनाथ दाते यांचे मनलावून काम केले. त्या विजयाला हातभार लावला निवडणुकीनंतर सातत्याने झावरे पाटील गटाला लक्ष करत डावलले जात आहे. याची मनाला सल असून याबाबत योग्य वेळी योग्य निर्णय घेतला जाईल.
> **– बबनराव पवार, उपसरपंच, ढवळपुरी**

> राष्ट्रवादी स्थापनेपासून स्वर्गीय वसंतराव झावरे पाटील व सुजित झावरे पाटील यांच्या समवेत तालुक्यात पक्षासाठी काम केले. आज तालुक्यात पक्षाचा आमदार झाला तरी आम्हाला कोणत्याही प्रक्रियेमध्ये सहभागी किंवा विचारले जात नाही. विश्वासात घेतले जात नाही हे मोठं खेदजनक आहे.
> **– अरुणराव ठाणगे, माजी सभापती**

## दिवा जंक्शन – एक चरित्र आणि चारित्र्य या पुस्तकाविरोधात तीव्र भूमिका

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२०, दिवा (ठाणे) :** दिवा परिसरातील दिवा जंक्शन एक चरित्र आणि चारित्र्य या पुस्तकामध्ये आगरी–कोळी समाजाविषयी खोटी, असत्य, बदनामीकारक व समाजविघातक माहिती प्रकाशित करण्यात आल्याने स्थानिक समाजबांधवांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला आहे.

या पार्श्वभूमीवर आगासनगाव संघर्ष समिती तर्फे ॲड. रोहिदास मुंडे व माजी नगरसेवक हिरा पाटील उदय मुंडे तर आगरी कोळी संघर्ष समितीतर्फे हेमंत नाईक किरण दळवी विराज पाटील प्रवीण तांडेल यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मुंब्रा पोलीस स्टेशन यांना निवेदन देऊन संबंधित लेखक राम माळी व प्रकाशक सुधीर राऊत यांच्या विरोधात तातडीने कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

या निवेदनात खालील भारतीय दंड संहितेच्या कलमान्वये कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे:

कलम १५३अ – विविध समाजांमध्ये वैमनस्य पसरविणे

कलम २९५अ – धार्मिक/सांस्कृतिक भावना दुखावणे

कलम ५०० – मानहानी

कलम ५०४ – जाणीवपूर्वक अपमान करून शांतता भंग करणे

कलम ५०५(२) – विशिष्ट समाजाविरुद्ध द्वेष व तणाव निर्माण करणे

या पुस्तकातील मजकूरामुळे समाजात तणाव निर्माण होऊन कायदा–सुव्यवस्था बिघडण्याचा धोका असल्याचे संघर्ष समितीने स्पष्ट केले आहे. म्हणूनच संबंधित लेखक व प्रकाशकाला तात्काळ अटक करून, विवादित मजकूर जप्त करण्यात यावा, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.



स्थानिक आगरी–कोळी समाज व भूमिपुत्र बांधवांनी देखील या कारवाईसाठी आपला पाठींबा दर्शविला असून, अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. यावेळी नितीन पवार पोलीस निरीक्षक, राजू पाचोरकर पोलीस निरीक्षक, शरद कुंभार पोलीस निरीक्षक, अमोल कोळेकर सहाय्यक पोलीस निरीक्षक, रवी सातपुते गोपनीय अमलदार यांना यावेळी निवेदन देण्यात आले. निवेदन देताना आगासनगाव संघर्ष समितीचे अध्यक्ष ॲड. रोहिदास मुंडे, माजी नगरसेवक हिरा पाटील, उदय मुंडे, आगरी कोळी संघर्ष समिती तर्फे विराज पाटील, किरण दळवी, हेमंत नाईक, प्रवीण तांडेल, महेश पाटील, सोपान म्हात्रे, अभिषेक ठाकूर, आशिष भोईर, परेश म्हात्रे, विजय म्हात्रे, नयन भगत, श्रीराम भगता चिन्मय पवार, यज्ञेश पवार, रतिलाल मुंडे आदी आगरी कोळी बांधव उपस्थित होते.

# संपादकीय

## द किंग ऑफ स्टॅण्ड अप कॉमेडी

प्रसिद्ध स्टॅण्ड अप कॉमेडियन राजू श्रीवास्तव यांचा आज २१ सप्टेंबर रोजी तिसरा स्मृतिदिन. दोन वर्षापूर्वी आजच्याच दिवशी त्यांची प्राणज्योत मालवली होती. त्यांच्या अकाली निधनाने मनोरंजन विश्वावर शोककळा पसरली होती. द किंग ऑफ स्टॅण्ड अप कॉमेडी अशी ओळख असलेल्या राजू श्रीवास्तव यांचा २५ डिसेंबर १९५३ रोजी उत्तरप्रदेश मधील कानपुर येथे जन्म झाला. राजू श्रीवास्तव यांचे वडील कवी होते. बलई काका नावाने त्यांच्या अनेक कविता प्रसिद्ध झाल्या होत्या.


राजू श्रीवास्तव लहान असताना आपल्या वडिलांच्या कविता म्हणत. शालेय वयातच त्यांना नकला करण्याचा छंद लागला. शाळेतील शिक्षकांच्या व गावातील माणसांच्या ते हुबेहूब नकला करत. पुढे ते अमिताभ बच्चन यांची नक्कल करू लागले. अमिताभ बच्चन यांचा हुबेहूब आवाज काढून त्यांनी केलेली नक्कल लोकांना इतकी आवडली की लोक त्यांना ज्युनिअर अमिताभ म्हणू लागले. अमिताभ बच्चन यांच्याप्रमाणेच त्यांनी चित्रपट सृष्टीतील इतर कलाकारांची देखील नक्कल करण्यास सुरुवात केली. त्यांचा हा नकलाचा कार्यक्रम प्रेक्षकांना आवडू लागला. कानपूरमधील प्रेक्षक त्यांना कॉमेडीसाठी बोलवू लागले. त्यांचे कार्यक्रम लोकप्रिय होऊ लागले तेंव्हा त्यांच्या एका मित्राने त्यांना त्यांच्या कॉमेडीची सीडी बनवून विकण्याचा सल्ला दिला. मित्राने दिलेला हा सल्ला त्यांच्यासाठी टर्निंग पॉईंट ठरला. राजू श्रीवास्तव यांनी त्यांच्या कॉमेडीची सीडी मार्केटमध्ये आणल्यानंतर त्यांच्या सिडीला प्रेक्षकांचा तुफान प्रतिसाद मिळाला. मुंबईतही त्यांच्या सीडी विकल्या जाऊ लागल्या. मुंबईतही त्यांना खूप प्रसिद्धी मिळाली त्यामुळे ते मुंबईत आले आणि चित्रपटांसाठी ऑडिशन देऊ लागले. तेजाब आणि मैने प्यार किया या चित्रपटात त्यांना छोट्या भूमिका मिळाल्या. त्यांनतर बाजीगर, मिस्टर आझाद या चित्रपटातही त्यांनी भुमीका केल्या मात्र या भूमिकांनी त्यांना समाधान दिले नाही त्यामुळे ते टीव्हीकडे वळले. देख भाई देख या विनोदी मालिकेत त्यांना काम करण्याची संधी मिळाली. त्यानंतर त्यांनी शक्तिमान या मालिकेत काम केले. चित्रपट आणि टीव्हीवर काम करताना त्यांनी त्यांची स्टॅण्ड अप कॉमेडी काही सोडली नव्हती ते स्टॅण्ड अप कॉमेडी करतच होते. २००५ साली टीव्हीवर द ग्रेट इंडियन लाफटर चॅलेंज नावाचा कॉमेडी शो आला होता. या शो मध्ये त्यांनी भाग घेतला. या शो ने त्यांना स्टार बनवले. या शो मध्ये त्यांनी सादर केलेले गजोधर काका, पिंकी पार्लरवाली ही पात्रे खूप लोकप्रिय झाली. या शो नंतर त्यांचे देशभर नाव झाले. त्यांना अनेक कार्यक्रमांमध्ये बोलावले जायचे. या काळात त्यांची कॉमेडी किंग अशीच इमेज झाली होती.

२००९ साली त्यांनी बिग बॉस शो मध्येही भाग घेतला होता. २००५ ते २०१० हा त्यांचा सुवर्णकाळ होता. या काळात त्यांची लोकप्रियता गगनाला भिडली होती. त्याचा लाभ घेऊन राजकारणात उतरण्याचा त्यांनी निर्णय घेतला. मात्र त्यांना राजकारण मानवले नाही त्यामुळे ते पुन्हा कॉमेडीकडे वळले. त्यांनी आपली स्टॅण्ड अप कॉमेडी पुन्हा सुरू केली. आपल्या स्टॅण्ड अप कॉमेडीने त्यांनी प्रेक्षकांची मने जिंकली. राजू श्रीवास्तव यांच्याप्रमाणे अनेकांनी स्टॅण्ड अप कॉमेडी करण्याचा प्रयत्न केला पण राजू श्रीवास्तव यांच्या सारखी नक्कल आणि स्टँड अप कॉमेडी कोणालाही जमू शकली नाही. २१ सप्टेंबर २०२२ रोजी त्यांचे अकाली निधन झाले. चित्रपट, टीव्ही आणि स्टेज शो मधून प्रेक्षकांना खळखळून हसवणारे राजू श्रीवास्तव यांचे असे अकाली जाणे प्रेक्षकांना चटका लावून जाणारे ठरले. स्टॅण्ड अप कॉमेडीचे किंग राजू श्रीवास्तव यांना तिसऱ्या स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

# देवीच्या मारक रूपाची उपासना : काळाची गरज !

नवरात्र हा खरेतर मांगल्याचा आणि पावित्र्याचा उत्सव. स्त्रीशक्तीचा जागर करण्याचा उत्सव, देवीच्या पराक्रमाची उपासना करण्याचा उत्सव. महिषासुराशी नऊ दिवस युद्ध करून नवव्या रात्री देवीने महिषासुराचा वध केला. या युद्धाचे प्रतीक म्हणून टिपऱ्या म्हणजेच दांडिया खेळल्या जातात.

आजमितीला मात्र या उत्सवाला आलेले ग्लॅमरस स्वरूप उत्सवाच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासला जात आहे. चांगले नृत्य करता यावे म्हणून तरुणींसह तरुणही एक महिना अगोदरपासून नृत्याचे क्लासेस घेऊ लागले आहेत. पाठ उघडी ठेऊन त्यावर रंगरंगोटी करण्याचे किळसवाणे फॅड गेल्या काही वर्षांपासून तरुणींमध्ये शिरले आहे. नऊ दिवस नऊ रंगांचे कपडे परिधान करणे, कपड्यांसह त्यांना मॅचिंग आभूषने परिधान करणे, साजेसा मेकअप करणे, गरबा नृत्य करताना अथवा दांडिया खेळताना इतरांपेक्षा वेगळे दिसण्याचा प्रयत्न करणे याकडेच महिलांचा अधिक कल दिसून येतो. एका राक्षसी प्रवृत्तीवर प्रकट स्त्रीशक्तीने युद्ध करून मिळवलेला विजय म्हणजे नवरात्रीचा उत्सव. या नऊ दिवसांत देवीने युद्ध करून क्षात्रतेजाच्या उपासनेचे महत्व पटवून दिले. स्त्री ही अबला नसून प्रसंगी अन्याय अत्याचाराचा कर्दनकाळ ठरू शकते हे देवीने स्वतः युद्ध करून दाखवून दिले. आज आपण नवरात्रीच्या काळात दांडिया किंवा टिपऱ्या खेळतो, हा खेळ नसून ते युद्धाचे प्रतीकात्मक स्वरूप आहे हेही आज अनेकांना माहित



नाही.

आजमितीला स्त्रियांवरील अत्याचाराच्या घटना कमालीच्या वाढल्या आहेत. ३ वर्षाच्या बालिकेपासून वयोवृद्धाही आज सुरक्षित नाहीत. बदलापूर पाठोपाठ पुण्यातील घटनेने साऱ्या राज्याला हादरवून सोडले. दुसरीकडे लव्ह जिहादरूपी राक्षस हिंदू स्त्रियांना विविध आमिषे आणि प्रलोभने दाखवून त्यांना प्रेमाच्या जाळ्यात ओढून हिंदूंचा वंशविच्छेद करू लागला आहे. राजकीय मंडळींना स्त्रियांच्या सुरक्षेपेक्षा राज्यात आपली सत्ता आणणे अधिक महत्वाचे वाटत असल्याने स्त्री सुरक्षेच्या दृष्टीने ठोस पावले उचललीच जात नाहीत. अशा वेळी स्त्रियांनीच आपल्या सुरक्षेसाठी सज्ज झाले पाहिजे. समाजाची ढासळलेली नीतिमत्ता पाहता प्रतिकूल प्रसंगांना सामोरे जाण्याची वेळ स्त्रियांवर कधीही येऊ शकते यासाठी प्रत्येक स्त्रीने आपले शरीर आणि मन प्रतिकारक्षम ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. त्याकरिता स्त्रियांनी स्वरक्षणाचे प्रशिक्षण घेणे आज अत्यंत गरजेचे बनले आहे. कराटे, लाठीकाठी यांसह आपल्या दैनंदिन वापरातील वस्तूंच्या आधारे स्वतःचे रक्षण कसे करावे, प्रवासात स्वरक्षणासाठी कोणती साधने स्वतःसोबत बाळगावीत यांचे विनामूल्य प्रशिक्षण देणाऱ्या संस्था आणि संघटना आज गावोगावी आहेत. त्यांचा लाभ करून स्वतःतील आत्मबल वाढवूया. जेव्हा कधी आपल्यावर प्रतिकूल प्रसंग येईल तेव्हा आपले नातेवाईक, मित्र मंडळी, पोलीस, राजकीय मंडळी आपले रक्षण करण्यास वेळेत पोहोचतील याची शाश्वती नाही अशा वेळी समोरच्याशी दोन हात करून त्याला धडा शिकवायचा असेल तर तेव्हढी शारीरिक आणि मानसिक क्षमता आपल्यामध्ये असणे आज आवश्यक आहे. आपल्यासोबत आपल्या परिसरातील, कार्यालयातील स्त्रियांना सबला बनवण्याचे दायित्व आज स्त्रियांनीच घेण्याची वेळ आली आहे. स्त्रियांना कायद्याचेही संरक्षण असल्याने समाजातील वासनांध प्रवृत्तीचा नायनाट करण्यासाठी स्त्रियांनीच पुढे यायला हवे. आजच्या स्त्रियांसमोर आदर्श हवा आहे तो रणरागिणी झाशीच्या राणीचा, राजमाता जिजाबाईंचा, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकरांचा. राणी चेन्नमांचा. स्त्रीशक्तीचा या प्रकट रूपाची उपासना करण्याची वेळ आता आली आहे. त्यामुळे या नवरात्रीला नवरात्री उत्सवामागील भावार्थ समजून घेऊन दुर्गादेवीच्या मारक रूपाची उपासना करण्याचा संकल्प करा !

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# पेटवणाऱ्या भावनिक मुद्द्यांपासून लोकांनी नेहमी सावध राहावे...

...जगात लोकशाही ही आदर्श राज्यप्रणाली समजली जाते. कारण त्यात लोकांच्या मताला महत्त्व असते. लोकांमधूनच नेते निवडून येतात. लोक आपल्या पसंतीचा उमेदवार निवडून देतात. त्यामुळे लोकांनी, लोकांचे, लोकांसाठी चालविलेले राज्य अशी आदर्श लोकशाहीची व्याख्या आहे. १९४७ साली ब्रिटिशांच्या अधिपत्त्याखालून भारताची मुक्तता झाली आणि आपल्याकडे लोकशाही आली. पण लोकशाहीसाठी लोकही तितकेच परिपक्क असण्याची गरज असते. नाही तर लोकशाहीचा खेळखंडोबा होतो. आपल्याकडील निवडणुका या विकासाच्या मुद्द्यांपेक्षा बरेचदा भावनिक मुद्द्यांवर लढवल्या जातात, असेच आपल्याला दिसेल. कारण जे उमेदवार म्हणून निवडणुका लढवत असतात, त्यांनाही माहीत असते की, आपल्याकडील लोकांना विकासाच्या मुद्द्यांपेक्षा भावनिक मुद्दे हे जास्त आवडतात. लोकांच्या भावनेला हात घातला की, त्यांना आपल्याकडे वळवता येते आणि त्यांची मते मिळवता येतात. खरे तर जसा काळ पुढे सरकतो, तसे समाजमन अधिक परिपक्क होत जाण्याची गरज आहे, पण तसे होताना दिसत नाही. राजकीय पक्षांचे नेते निवडणुकीच्या तोंडावर भावनिक मुद्दे उपस्थित करतात, त्या पक्षांचे कार्यकर्ते ते मुद्दे लोकांपर्यंत पोहोचवतात, लोकांना चेतवतात. आता समाज माध्यमे हे तर मोठे शस्त्र सगळ्यांच्याच हाती आहे, त्याचा उपयोग आक्रमकपणे केला जातो. त्यामुळे अशा पेटवापेटवीपासून सावध राहून लोकांनी शहाणे होण्याची गरज आहे, पण तसे होताना दिसत नाही. भावनिक मुद्दे हे अल्पावधीत मोठा फायदा मिळवून देत असतात. त्यामुळे नेत्यांकडून त्याचा वापर केला जातो.



**कव्हर स्टोरी**
**- शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**कागल-कोल्हापूर..**

परिणामी विकासाचे कार्यक्रम, पायाभूत सुविधा याची चर्चा मागे पडते.

भावनिक मुद्दे लोकांमध्ये पेरून त्यांना पेटवण्यात आपल्याकडील कुठलाच पक्ष मागे नाही. जेव्हा त्यांचा सामूहिक फायदा असतो, त्यावेळी ते त्यांच्यातील मतभेद बाजूला ठेवून एकत्र येतात. आमदार, खासदारांचे पगार, भत्ते, निवृत्ती वेतन आणि इतर सुविधा वाढवून घ्यायच्या असतात, त्यावेळी सगळ्या राजकीय पक्षांचे सभागृहात एकमत असते, पण इतरवेळी मात्र हिच मंडळी सभागृहांचे कामकाज अनेक वेळा ठप्प करून लोकांचे कोट्यवधी रुपये वाया घालवतात. त्यामुळे राजकीय पक्षांना हाताच्या बोटांची उपमा दिली जाते, म्हणजे ती उंचीने लहान मोठी असली तरी जेव्हा काही खायची वेळ असली की, मात्र एकमेकांना सहकार्य करून एकत्र येतात आणि आपला कार्यभाग साध्य करतात. त्यामुळे आपण ज्यांना आपले प्रतिनिधी म्हणून निवडून देतो, ते आपल्या समस्या सोडवत आहेत की, निवडणुकीच्या तोंडावर काही भावनिक मुद्दे उपस्थित करून आपल्याला चिथावून आपले लक्ष विकासाच्या मुद्द्यावरून दूर नेत आहेत, याचा लोकांनी विचार करण्याची गरज आहे. भावनिक मुद्दे उपस्थित करून कुठल्या पक्षाचे कार्यकर्ते सार्वजनिक आणि खासगी मालमत्तेचे नुकसान करत असतील तर न्यायालयाने त्यांच्यावर कडक कारवाईचे आदेश द्यायला हवेत, त्यांच्याकडून त्याची नुकसानभरपाई करून घ्यायला हवी. आपल्याकडे राजकारण हा अल्पावधीत श्रीमंत होण्याचा एक धंदा होऊन बसलेला आहे. कारण राजकारण हे समाजसेवेसाठी असते, पण समाजाची सेवा करण्यासाठी लोकांनी निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींची मालमत्ता इतकी प्रचंड प्रमाणात कशी काय वाढते. त्याचा विस्तार देशविदेशात कसा होतो, हे काही आता गुपित राहिलेले नाही. याला सन्माननीय अपवाद आहेत.

बिहारमध्ये विधानसभा निवडणुकीचा सध्या प्रचार सुरू आहे. त्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांच्या मातोश्री हिराबेन यांचा एआय व्हिडिओ तयार करून तो काँग्रेसच्या पोर्टलवर प्रसारित करण्यात आला. त्यात मोदींची आई त्यांना दम देत आहे, असे दाखवण्यात आले आहे. हे प्रकरण न्यायालयात गेले. त्यानंतर पटणा उच्च न्यायालयाने तो एआय व्हिडिओ पोर्टलवरून काढून टाकण्याचे आदेश दिले. तर मुंबईत शिवसेना नेते उद्धव ठाकरे यांच्या मातोश्री मीनाताई ठाकरे यांच्या शिवाजी पार्क येथील पुतळ्यावर कुणीतरी लाल रंग उडवल्याचे बुधवारी सकाळी निदर्शनास आले. ही बातमी सगळीकडे पसरल्यानंतर शिवसैनिक पुतळ्याजवळ एकत्र झाले. त्यांनी आपला संताप व्यक्त केला. स्वतः उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी पुतळ्याजवळ येऊन पाहणी केली. यावेळी महाराष्ट्र पेटवण्यासाठी कुणी तरी हे कृत्य केले असावे, असे मत उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केले. तसेच अठरा वर्षांपूर्वी या पुतळ्याच्या ठिकाणी अशीच घटना घडल्याची आठवण करून दिली. हा प्रकार कुणी केला याचा पोलीस शोध घेत आहेत, पण अजून आरोपी सापडलेला नाही. त्या परिसरात पाच सीसीटीव्ही कॅमेरे आहेत, पण एकाचेही तोंड मीनाताईंच्या पुतळ्याच्या दिशेने नाही, एक फिरता सीसीटीव्ही आहे, पण तो फिरतच नव्हता, असे निदर्शनास आले आहे. या कृत्याच्या मागे कोण आहे ते यथावकाश कळेल, पण बिहार काय किंवा मुंबई काय, अशा घटना जेव्हा निवडणुकांच्या तोंडावर घडतात तेव्हा लोकांनीच सावध राहण्याची गरज आहे. कारण निवडणूक जवळ आली की, बरेचदा लोकभावना भडकवण्यासाठी काही गोष्टी घडविल्या जाऊ शकतात. त्यामुळेच लोकांनी शहाणे होऊन आपली लोकशाही अधिक प्रगल्भ करण्याची गरज आहे. नाही तर विकासाचे मुद्दे बाजूला राहतील आणि भावनिक मुद्द्यांवर राजकीय पोळ्या शेकल्या जात राहतील.

## चक्की..

पवन चक्क्या देती
अपारंपारिक उर्जा
कौतुकास्पदविषय
उच्चतम असे दर्जा

प्रदूषण संपूर्णशून्य
नव्या युगाचा राजा
वाढत जाई बस्तान
चालला गाजावाजा

एकवटलेल्या शक्ती
करी धंद्याचा कब्जा
सरळव्यवहार बदले
उडतो पुरता फज्जा

दिसे चांगला मलिदा
शोभिवंत तो सज्जा
घुसल्या विचीत्रशक्ती
जाणवू लागे मज्जा

गुन्हेगारी करी प्रवेश
गुंडाळी लाज लज्जा
फायदा करी विध्वंस
हलू पाहे पुर्जा पुर्जा

ग्रासू पाहते ते ग्रहण
स्वच्छ नितळ राज्या
बिघडली समीकरणे
अधिकार गाजे त्रिजा

**– हेमंत मुसरीक, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# पुण्यात मुसळधार पावसातही येरवडा वाहतूक पोलिसांचा 'कर्तव्यदक्ष' जागर

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१९ येरवडा (पुणे) :** शहरात आज सकाळपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी रस्ते पाण्याखाली गेले. तर काही भागात गटारांचे झाकण उघडे राहिल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागला. मात्र, येरवडा वाहतूक विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी कर्तव्यदक्षतेचे उत्कृष्ट उदाहरण घालून दिले.

विश्रांतवाडी वाहतूक विभागाचे अंमलदार भर पावसातच रस्त्यावर उतरले. चौकातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी त्यांनी सतत वाहनचालकांना मार्गदर्शन केले. एवढेच नव्हे, तर पावसाचे पाणी साचलेल्या ठिकाणी स्वतः पुढाकार घेऊन पाण्याला निचरा व्हावा म्हणून मार्गही मोकळा केला.

या संपूर्ण नियोजनामध्ये येरवडा वाहतूक विभागाच्या पोलीस निरीक्षक संगीता जाधव मॅडम यांनी स्वतः देखरेख ठेवत सर्व चौकातील



स्टॉपवरील अंमलदारांना मार्गदर्शन केले. परिणामी, विभागातील कुठल्याही चौकात वाहतूक कोंडी होऊ दिली नाही. एरोडा डिव्हिजनच्या महिला अधिकाऱ्यांनी देखील प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी तत्परतेने काम केले.

भर पावसातही पोलिसांचे असे समर्पित काम पाहून स्थानिकांनी समाधान व्यक्त केले आहे. कर्तव्यदक्ष पोलीस हेच खरे संकटमोचक, अशी प्रतिक्रिया काही नागरिकांनी दिली. पुणेकरांच्या सुरक्षिततेसाठी वाहतूक पोलिसांनी घेतलेला हा पुढाकार कौतुकास्पद ठरत आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात


## उटंबर समुद्रकिनारी सागर तट स्वच्छता अभियान



**अक्षराज : कृष्णा श्रावणपाटील**

**दि.२०, दापोली (रत्नागिरी) :** आंतरराष्ट्रीय किनारपट्टी स्वछता दिनाचे औचित्य साधून दापोली तालुक्यातील उटंबर कोळीवाडा येथे भास्कर राजाराम श्रावणपाटील यांच्या नेतृत्वाखाली शनिवार, दिनांक २० सप्टेंबर २०२५ रोजी किनारपट्टी वरील कचरा साफ करण्यात आला. सागरी सीमा मंच रत्नागिरी यांच्या माध्यमातून राबवण्यात आलेल्या सागर स्वच्छता अभियानात सहभागी होऊन ग्रामस्थानी संपूर्ण किनारपट्टी स्वच्छ केली. यामध्ये जि.प.शाळा उटंबर चे सर्व विध्यार्थी, मुख्याध्यापक व ओंकार मच्छिमार सोसायटी चे सभासद, अंगणवाडी सेविका. सहभागी झाले होते. विशेष महिला मंडळ अध्यक्ष, अमृता पालेकर, सचिव, गीता श्रावणपाटील आणि सर्व महिला मंडळ या मोहिमेत सहभागी होते. या मोहिमेत मोलाचे सहकार्य गावचे अध्यक्ष, सुदर्शन श्रावणपाटील, उपाध्यक्ष, गणेश कुलाबकर, सदस्य दिवेश कालपाटील,विष्णू पाटील, हरिश्चन्द्र कालेकर, नरेश कुलाबकर, अशोक कुलाबकर, सोमनाथ कुलाबकर, नीलकंठ कुलाबकर, संतोष कुलाबकर, पोलीस पाटील, श्रीकांत साबळे, ग्रामसेवक भाऊ आणि सर्व राधाकृष्ण महिला व पुरुष मंडळ यांचे लाभले. शेवटी राधाकृष्ण मंदिर ट्रस्टचे सचिव वीरेंद्र नांदगावकर यांनी सर्वांचे आभार व्यक्त करत मोहिमेची सांगता केली.

## विंचूर येथील - नेवगे वस्ती - सुभाषनगर रस्त्याच्या दुरुस्तीची मागणी



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२०, विंचूर (नाशिक) :** विंचूर - नेवगे वस्ती - सुभाषनगर या मुख्य रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून, नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे सदर रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी येथील नागरिकांनी निवेदनाद्वारे केली आहे. विंचूर येथील नेवगे वस्ती व सुभाषनगर परिसरातील नागरिकांनी अन्न व नागरी पुरवठा मंत्री तथा आमदार छगनरावजी भुजबळ यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, विंचूर-नेवगे वस्ती-सुभाषनगर रस्ता पूर्णपणे खड्डेमय झाला असून, रस्त्यावरून वाहने चालवणे कठीण झाले आहे. काही दिवसांपूर्वी या रस्त्याची डांबरीकरणाची कामे सुरू झाली होती, मात्र ठेकेदाराने केवळ १ कि.मी. काम करून काम बंद केले आहे. उर्वरित रस्त्यावर काम झाले नसल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे.

या मार्गावरून शालेय विद्यार्थ्यांना दररोज प्रवास करावा लागतो. तसेच शेतकरी आपला माल बाजारपेठेत नेण्यासाठी याच रस्त्याचा वापर करतात. खड्डेमय रस्त्यांमुळे अपघातांचे प्रमाण वाढले असून, शेतमाल ने-आण करण्यासही अडचणी निर्माण झाल्या आहेत. रस्त्याच्या खराब स्थितीमुळे स्थानिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत असल्याचे ही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

स्थानिक नागरिकांनी दिलेल्या या निवेदनावर संदीप नेवगे, दीपक नेवगे, सोमनाथ नेवगे, विक्रम नेवगे, संजय नेवगे आदींसह अनेकांनी स्वाक्षऱ्या करून रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की, आमच्या दैनंदिन जीवनासाठी हा रस्ता महत्त्वाचा आहे. तरी प्रशासनाने या रस्त्याचे काम लवकर पूर्ण करून द्यावे. स्थानिकांमध्ये अपेक्षा आहे की, आमदार छगन भुजबळ यांच्या प्रयत्नाने हा प्रश्न तातडीने मार्गी लागेल.

## बांधकाम स्थळी खाली पडल्याने स्टोअर मॅनेजरचा जागीच मृत्यू

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२०, ठाणे :** बांधकाम सुरू असलेल्या इमारतीच्या सातव्या मजल्यावरून काम करीत असताना ४९ वर्षीय सचिन गुंडेकर यांचा खाली पडून मृत्यू झाल्याची घटना दिनांक १९ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी अडीचच्या सुमारास घडली. घटनेची माहिती मिळताच ठाणे पालिकेचे आपत्ती व्यवस्थापन दलातील कर्मचारी, कापूरबावडी पोलिस, अग्निशमन दलाचे जवान पोहोचले. मात्र, डोक्याला मार लागल्याने त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली. डोक्याला दुखापत झाल्याने सचिन यांचा जागीच मृत्यू झाल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली.

कापूरबावडी पोलिस ठाणेअंतर्गत हायलॅन्ड पार्क ढोकाळी येथे ३२ मजली इमारतीचे बांधकाम सुरू आहे. हे काम सुरू असताना सचिन हे सातव्या मजल्यावर कामासाठी गेले होते. ते स्टोअर मॅनेजर म्हणून याठिकाणी काम करतात. काम करीत असताना अचानक तळमजल्यावर पडले. ते खाली तळमजल्यावर असलेल्या लोखंडी परांची व दोरखंडात ते अडकले होते. घटनेची माहिती मिळाल्यानंतर बाळकूम अग्निशमन केंद्राचे जवान, कापूरबावडी पोलिस ठाण्याचे पोलिस, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी यांनी रुग्णवाहिकेसह दाखल झाले.

## रोडपाली भागात डेब्रिज टाकणाऱ्या गाडीचालकावर कारवाई

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२०, पनवेल :** महानगरपालिकेच्या स्वच्छता निरीक्षकांनी रोडपाली परिसरात डेब्रिज उतरवत असताना गाडी पकडून संबंधित चालकावर दंडात्मक कारवाई केली आहे. या चालकास ५ हजार रुपये दंड करण्यात आला आहे.

आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छ भारत अभियान महापालिका कार्यक्षेत्रात राबविले जात आहे. स्वच्छ भारत अभियानाच्या उद्दिष्टांनुसार शहरात स्वच्छता राखण्यासाठी पालिकेचे सफाई कर्मचारी सातत्याने काम करीत असतात. या पार्श्वभूमीवर ही कारवाई अत्यंत महत्त्वाची आहे.

पालिकेच्या प्रभाग क्रमांक ७, रोडपाली विभागातील सेक्टर १७ येथे गाडीतून डेब्रिज उतरवित असताना स्वच्छता निरीक्षक हरेश कांबळे, दिघ्नेश भोईर व अमित जाधव यांनी गाडी पकडली. संबंधित चालकावर डेब्रिज टाकल्याबद्दल दंडात्मक कारवाई करून ५ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. यावेळी पालिकेचे सुपरवायझर व कर्मचारी उपस्थित होते.

शहरात सार्वजनिक ठिकाणी, सर्वत्र स्वच्छता राखण्यासाठी नागरिकांनी महापालिकेच्या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. कोणत्याही प्रकारचा कचरा सार्वजनिक ठिकाणी न टाकता तो योग्य पद्धतीने कचरा कुंडीत टाकावा, असे आवाहन उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी महापालिकेच्यावतीने केले आहे.

# साहेबांना पैसे दिल्याशिवाय सही करत नाहीत !

## जातपडताळणीसाठी महिलेने घेतली १८ हजारांची लाच



**महिलेचा मोबाईल तपास महत्त्वाचा**

आरोपी महिलेचा मोबाईल ताब्यात घेण्यात आला आहे. त्या महिलेने कार्यालयातील लाच कोणासाठी स्वीकारली,तिचा संपर्क कोणासोबत होता. यापूर्वी अशाप्रकारे किती जात प्रमाणपत्रे देण्यात आली याबाबत तपास सुरू आहे. या लाच प्रकरणातील आरोपींमध्ये अधिकाऱ्यांचा किंवा कर्मचाऱ्यांचा सध्या तरी समावेश केलेला नाही, तपास सुरू आहे. त्यात नेमके काय निष्पन्न होईल, ते आताच सांगता येणार नाही.

**- छाया देवरे, पोलिस निरीक्षक, लाचलुचपत विभाग**

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२०, अहिल्यानगर :** जात पडताळणी ऑफिसमधील साहेबांना पैसे दिल्याशिवाय ते प्रमाणपत्रावर सही करत नाहीत, असे म्हणून कुणबी जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी १८ हजारांची लाच स्वीकारताना एका खासगी महिलेला लाचलुचपत विभागाने ताब्यात घेतले. दरम्यान, संबंधित महिलेने ही लाच कोणासाठी घेतली होती. याचा तपास सुरू आहे.

याबाबतची माहिती अशी की, तक्रारदाराच्या मुलीला पुढील शिक्षणाकरिता कुणबी जातीचे पडताळणी प्रमाणपत्र आवश्यक होते. त्यासाठी दिनांक १६ जून २०२५ रोजी येथील जिल्हा जातपडताळणी समितीकडे अर्ज व पूरक कागदपत्रे जमा केली होती. परंतु ते प्रमाणपत्र अद्याप मिळाले नाही. तक्रारदारास एका सायबर कॅफेच्या संचालकांनी उषा मंगेश भिंगारदिवे यांच्याशी संपर्क करून दिला.

भिंगारदिवे यांनी, 'तुमच्या मुलीचे जात पडताळणी प्रमाणपत्र मी मिळवून देते. परंतु त्यासाठी मला २० हजार रुपये द्यावे लागतील. ऑफिसमधील साहेबांना पैसे दिल्याशिवाय ते प्रमाणपत्रावर सही करत नाहीत,' असे म्हणत लाचेची मागणी केली. तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार नोंदवली.

तक्रारीची पडताळणी दिनांक १८ सप्टेंबर २०२५ रोजी झाली. संबंधित महिलेने तक्रारदाराकडे जात पडताळणी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी व स्वतःसाठी १८००० रुपयांच्या लाचेची मागणी करून ती स्वीकारण्याची तयारी दर्शविली. तसेच १८ हजार रुपये स्वीकारताना तिला रंगेहात पकडण्यात आले. संबंधित महिलेवर तोफखाना पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लाचलुचपत विभागाचे उपाधिक्षक अजित त्रिपुटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक छाया देवरे यांनी ही कारवाई केली. कारवाईत पोलिस कॉन्स्टेबल सचिन सुद्रुक, गजानन गायकवाड, वैभव सुपेकर आदींनी सहभाग नोंदवला.

# लोणंद नगरपंचायतीत कोट्यवधींचा अपहार?

## गणेश दणाने व सागर खरात यांचा गंभीर आरोप; उपोषण व जलसमाधीचा इशारा

**अक्षराज : स्वप्नील जावळे**

**दि.२०, लोणंद (सातारा) :** लोणंद नगरपंचायत स्थापनेपासून आतापर्यंत साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे दलित वस्ती सुधार योजना या योजनेत कोट्यवधी रुपयांचा निधी हडप झाल्याचा गंभीर आरोप गणेश दणाने व सागर खरात यांनी केला आहे. जिल्हाधिकारी संतोष पाटील यांना याबाबत निवेदन देण्यात आले आहे. त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, जिल्हाधिकारी सातारा तसेच सहाय्यक आयुक्त समाजकल्याण सातारा यांच्याकडे पुराव्यासह तक्रार अर्ज दाखल करूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.

उलट, सह आयुक्त नगरपालिका प्रशासन शाखा जिल्हाधिकारी कार्यालय सातारा यांनी जाणीवपूर्वक प्रकरणाकडे दुर्लक्ष करून भ्रष्टाचाराला पाठीशी घातल्याचा संशय आहे.

दणाने व खरात यांनी प्रशासनावर थेट आरोप करत इशारा दिला आहे की, दिनांक २९ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १० वा. जिल्हाधिकारी कार्यालय सातारा समोर दोन दिवसीय आमरण उपोषण करण्यात येईल.तसेच या उपोषणाची दखल न घेतल्यास दिनांक ०१ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११ वा. पाडेगाव येथील नीरा उजवा कालव्यात जलसमाधी आंदोलन करण्यात येईल.

**मुख्य मागण्या :-**

दलित वस्ती सुधार योजना अपहार प्रकरणी १५ दिवसांत चौकशी समिती गठीत करणे.दोषींवर ॲट्रॉसिटी कायद्यान्वये गुन्हे दाखल करणे.लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून मालमत्तेची चौकशी.ग्राम पंचायतीतील सर्व ठरावांची चौकशी.१० वर्षांपासून



एकाच पदावर असलेल्या अधिकाऱ्यांची बदली.गणेश दणाने व सागर खरात यांनी स्पष्ट केले आहे की, दलित समाजावर झालेला अन्याय सहन केला जाणार नाही, भ्रष्टाचार करणाऱ्यांना वाचविणाऱ्या अधिकाऱ्यांना ही जबाबदार धरले जाईल.तसेच सुंदरनगर प्रभाग क्र १७ मध्ये सिमेंट पेव्हर ब्लॉक टाकले संदर्भात ठराव मंजूर करून करण्यात आलेले कामाची चौकशी करण्यात यावी.

# पांडुरणा परिसरात भूगर्भातून भूकंप सदृश्य आवाज; नागरिक भयभीत

## प्रशासनाने योग्य उपाययोजना करण्याची गावकऱ्यांची मागणी

भोकर तालुक्यातील पांडुरणा, किन्हाळा, भोकर शहर या ठिकाणी असे धक्के जाणवले असुन याचे केंद्र भोकर तालुक्यांतील बोरवाडी या ठिकाणी असल्याची नोंद एस.आर.टी.नांदेड येथील भुमापक रिश्टर स्केलवर १.१ तिव्र धक्क्याची नोंद झाली आहे. मि धक्के बसत असलेल्या ठिकाणी भेटी दिल्या असुन येत्या २ दिवसात जि.एस.डिए ची टिम पांडुरणा व परिसरात पाचारण करणार असुन टिमचा अहवाल मीळाल्या नंतर पुढील प्रक्रिया प्रशासनाच्या वतिने करण्यात येईल तेव्हा नागरिकांनी घाबरुन न जाता काळजी घ्यावी व सुरक्षित रहावे प्रशासन या सर्व बाबीकडे लक्ष ठेऊन असुन गरज भासल्यास विशेष भुतज्ञांची टिम देखील पाचारण करण्यात येईल.

**– विनोद गुंडमवार (तहसीलदार, भोकर)**

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२०, नांदेड :** भोकर तालुक्यातील पांडुरणा गावांमध्ये भूगर्भातून भूकंप सदृश्य आवाज येत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून नागरिकांनी सुरक्षित राहण्याच्या सूचना प्रशासनाच्या वतीने देण्यात आले आहेत.

तालुक्यांतील पांडुरणा या गावामध्ये मध्ये दिनांक १९ सप्टेंबर २०२५ रोजी सायंकाळी साडेसहाच्या दरम्यान आणि शनिवार, दिनांक २० सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ४:३० च्या दरम्यान भूकंप सदृश्य आवाज आल्याने नागरिकांमध्ये भूकंप अशी एकच तारांबळ उडाली होती. एका मागोमाग दोन ते तीन असे धक्के बसल्यानंतर गावांतील सरपंच यांनी तात्काळ याची माहिती भोकर तहसील कार्यालयाला दिले असता भोकर तहसीलच्या वतीने सज्जाचे तलाठी मुळेकर यांनी रात्री गावांत भेट देऊन नागरिकांनी स्वतः ची कुटुंबाची काळजी घ्यावी. सर्वांनी सुरक्षित स्थळी राहावे आणि घराच्या पत्रावरील दगड धोंडे बाजूला खाली ठेवावेत निसर्गाचे काही सांगता येत नाही आपण खबरदारी घ्यावी.

अशा सूचना यावेळी देण्यात आल्या असून या संदर्भात राष्ट्रीय भूकंप विज्ञान केंद्राच्या संकेतस्थळावर तपासले असता या आवाजाची धक्क्याची कुठलीही नोंद झाली नसल्याचे आढळून सांगण्यात आले असून अजून या बाबतीत सूक्ष्म अभ्यास करण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील अर्थ सायन्स विभागाचे प्राध्यापक डॉ. टी. विजयकुमार यांना देखील माहिती घेण्यास सांगितले आहे.

पुन्हा असा आवाज आलाच तर पटकन घराबाहेर मोकळ्या जागेत गोळा व्हावे व प्रशासनाला संपर्क करून कळवावे तसेच कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये असे आवाहन ही यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी जनतेला केले आहे.

**मागील २ वर्षापासूनचा हा प्रकार**

पांडुरणा गावांमध्ये व परिसरामध्ये मागील दोन वर्षापासून हा प्रकार जाणवत असुन या बाबत भूवैज्ञानिक यांची टिम देखील सप्टेंबर २०२३ मध्ये गावात पाहणी करुन गेली पण नेमका हा काय प्रकार आहे हे स्पष्ट झाले नाही.

त्या नंतर नागपुर येथील टिम येणार असल्याचे व त्यांच्याकडे पत्रव्यवहार केल्याचे ही तालुका व जिल्हा प्रशासनाच्या वतिने सांगण्यात आले परंतु दोन वर्षे झाली ना कुठली टिम आली ना या गुढ आवाजाचे गुढ उकलले गावांतील नागरिक या प्रकारामुळे अतिशय भयभीत झाले असुन प्रशासनाने नुसते आश्वासनं न देता या वरती नागपूर येथील तज्ञांना पाचारण करुन नेमका प्रकार काय आहे याचा शोध घ्यावा व नागरिकांना भयमुक्त करावे आशी मागणी आता भयभीत पांडुरणा गावातील नागरिक करीत आहेत.

# मुख्यमंत्री कार्यालयातील सहसचिव पठाण यांच्याशी शिक्षक परिषदेची चर्चा

शासन आदेशानुसार राज्यभरातील ६ टप्प्यांमध्ये बदली झालेल्या चंद्रपूर सह अन्य जिल्हा परिषदांमधील प्राथमिक शिक्षकांना तात्काळ भारमूक्त करण्याचे संबंधित जिल्हा परिषदांना शासनाने आदेश देऊन राज्यभरात होत असलेला दूजाभाव थांबवावा, त्याचप्रमाणे बदली चा सातवा टप्पा पूर्ण करून त्यामधील शिक्षकांना सुद्धा तात्काळ भारमूक्त करून शासन आदेशाची अंमलबजावणी व्हावी.

**प्रकाश चुनारकर**

**राज्य कार्याध्यक्ष महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग**

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२०, चंद्रपूर :** शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदल्यांचे एकूण ६ टप्पे राबविण्यात आले असून त्याबाबतचे बदली आदेश ऑनलाईन पोर्टलवर अपलोड करण्यात आले आहे. परंतु चंद्रपूरसह राज्यातील काही जिल्हापरिषदांनी अद्यापही बदली आदेश अंमलबजावणी केली नाही.त्यामूळे बदली आदेश अंमलबजावणी न झालेल्या चंद्रपूर सह अन्य जिल्हा परिषदांमधील ६ टप्प्यांमधील बदली झालेल्या शिक्षकांच्या बदली आदेश अंमलबजावणी संदर्भात मुख्यमंत्री कार्यालयातील सहसचिव आशा पठाण (निचत) यांचेशी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभागाचे राज्य कार्याध्यक्ष प्रकाश चुनारकर यांनी सविस्तर चर्चा केली. त्याचबरोबर जिल्हा परिषद चंद्रपूर मधील प्राथमिक शिक्षकांचे मासिक वेतन निश्चित कालावधीत होणे, शासन स्तरावर टिईटी संदर्भात धोरणात्मक निर्णय घेणे याबाबत सुद्धा निवेदन दिले. दरम्यान आमदार संदीप जोशी यांनी सुद्धा महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभागाचे निवेदनाचे अनुषंगाने संबंधित खात्याचे प्रमुखांकडे पत्र पाठवून लक्ष वेधले आहे. दरम्यान राज्यभरातील बहुचर्चित प्राथमिक शिक्षकांचे बदलीचा सातवा टप्पा क्रमांक ७ अखेर सुरू झाला असून अर्ज भरण्यासाठी शिक्षकांना २० सप्टेंबर २५ ते दिनांक २३ सप्टेंबर २५ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. बदली पोर्टलवरील सूचनेनुसार शिक्षकांची यादी पोर्टलवर उपलब्ध करण्यात आली असून शिक्षणाधिकारी लॉगिंग मधून ही यादी प्रसिद्ध करण्यात यावी, असे सूचनेत म्हटले आहे.

# आतापर्यंत गोट्या खेळत होता का? ही माणसं जर पिसाळली ना, तर...';

## रोहित पवार आमसभेत सरकारी अधिकाऱ्यावर का भडकले?

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२०, अहिल्यानगर :** अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यात दिनांक १९ सप्टेंबर २०२५ रोजी झालेल्या आमसभेत आमदार रोहित पवारांचं आक्रमक रूप पाहायला मिळालं. प्रशासनातील कामचुकारपणा वर बोट ठेवत अधिकाऱ्यांना चांगलेच सुनावले. गटार योजनेत ठेकेदारांकडून होत असलेल्या निकृष्ट दर्जाच्या कामावर नागरिकांनी केलेल्या तक्रारी त्यावर अधिकाऱ्यांकडून मिळालेल्या टाळाटाळीच्या उत्तरांमुळे आमदार पवार प्रचंड संतापले. सोशल मीडियावर रोहित पवार यांचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे.

सर्वांसमोर नगरपरिषद अधिकाऱ्यांना झापलं, रोहित पवारांचा रुद्रावतार, आम सभेत राडा



नागरिकांच्या प्रश्नांवर समाधानकारक भूमिका न घेता अधिकाऱ्यांकडून मि ळालेल्या मोघम उत्तरांमुळे आमदार पवारांनी थेट अधिकाऱ्यालाच धारेवर धरले. आतापर्यंत गोट्या खेळत होता का? तक्रार करणारे नागरिक बावळट आहेत का? तू मिजासखोर बनून ॲटीट्युड दाखवू नकोस. हा तुमच्या बापाचा पैसा नाही, हा लोकांचा पैसा आहे, अशा शब्दांत त्यांनी अधिकाऱ्याला झापले.

सभागृहात उपस्थित असलेल्या नागरिकांसमोरच आमदार पवारांनी कठोर शब्दात इशारा देत म्हणाले की, अशा प्रकारचे निकृष्ट काम आणि बेफिकीर वृत्ती जर सुरू राहिली तर लोकांना थेट शेण थापायला सांगा. कामचुकार अधिकाऱ्यांना लोक माफ करणार नाहीत, असं रोहित पवार यांनी म्हटलं आहे. गेल्या काही महिन्यांपासून जामखेड नगरपरिषदेच्या माध्यमातून सुरू असलेल्या गटार योजनेत दर्जे दार काम होत नसल्याच्या तक्रारी नागरिकांनी वारंवार केल्या होत्या. मात्र प्रशासनाकडून गंभीर दखल घेतली गेली नसल्याने अखेर आमदारांनी सभागृहातच अधिकाऱ्याला सुनावले.

दरम्यान रोहित पवारांनी अधिकाऱ्याला आक्रमकपणे फटकारल्यामुळे सभागृहात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. नागरिकांनीही आमदारांच्या भूमिकेला जोरदार दाद दिली. पैसे जनतेचे आहे काम जबाबदारीने झालंच पाहिजे. बेफिकीरी वृत्ती सहन केली जाणार नाही, असा स्पष्ट संदेश रोहित पवारांनी प्रशासनाला दिला आहे.

# स्वच्छता ही सेवा अभियानात नवी मुंबईतील शाळा - महाविद्यालयांतून प्लास्टिक संकलन

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२०, नवी मुंबई :** स्वच्छता ही सेवा अभियानांतर्गत १७ सप्टेंबर पासून ०२ ऑक्टोबर पर्यंत विविध उपक्रम राबविण्यात येत असून आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार लोकसहभाग वाढीवर विशेष भर देण्यात येत आहे. अभियान कालावधीत प्रत्येक दिवशी करावयाच्या उपक्रमांचे कॅलेंडर तयार करण्यात आले असून त्यानुसार महानगरपालिका क्षेत्रातील विविध शाळा व महाविद्यालयांमध्ये प्लास्टिक संकलनाच्या विशेष मोहीमेचे आयोजन करण्यात आले होते.

अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे यांच्या माध्यमातून नवी मुंबई महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभाग आणि प्रोजेक्ट मुंबई या स्वयंसेवी संस्थेच्या संयुक्त विद्यमाने प्लास्टिक संकलनाची विशेष मोहीम महापालिका क्षेत्रातील ५६ शाळा व महाविद्यालयांमध्ये नमुंमपा शिक्षण विभागाच्या सहयोगाने यशस्वीपणे राबविण्यात आली.

यामध्ये ५६ शाळा – महाविद्यालयांम धून एकुण १३६४ किलो प्लास्टिक संकलन करण्यात आले. यामध्ये एकल वापराचे प्लास्टिक, चॉकलेटचे रॅपर, सॅशे, प्लास्टिक बॉटल्स, फूड कंटेनर तसेच घरातील प्लास्टिकच्या टाकाऊ वस्तू अशा विविध प्रकारच्या प्लास्टिक कचऱ्याचे संकलन करण्यात आले. या प्लास्टिक कचऱ्यावर पुनर्प्रक्रिया करुन नवीन आकर्षक वस्तुंची निर्मिती करण्यात येणार आहे.

या मोहीमेमध्ये शाळा – म हाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक यानी मोठ्या प्रमाणात उत्साहाने सहभाग नोंदविला. यामध्ये– एमईएस विद्यामंदीर बेलापूर, ज्ञानदीप सेवा मंडळ प्राथमिक आणि माध्यमिक विद्यालय (इंग्रजी माध्यम) करावे, नमुंमपा शाळा क्र.११७ दिवाळे गाव, नमुंमपा शाळा क्र.०२ दिवाळेगाव, नमुंमपा शाळा क्र.११२ करावे गांव, गुड शेफर्ड विद्यालय, विद्याभवन विद्यालय नेरूळ, नमुंमपा शाळा क्र.९ नेरुळ, नमुंमपा शाळा क्र.९२ कुकशेत, नमुंमपा शाळा क्र.१० नेरुळगांव, तेरणा विद्यालय प्राथमिक (सेमी इंग्रजी माध्यम) नेरुळ, नमुंमपा शाळा क्र.९८ (सीबीएससी), शिरवणे विद्यालय आणि ज्युनियर कॉलेज, एपीजे विद्यालय नेरूळ, टिळक कॉलेज नेरुळ, नमुंमपा शाळा क्र.१६ शिवाजीनगर,



नमुंमपा शाळा क्र.१८ सानपाडा, नमुंमपा शाळा क्र.३० कोपरी, आयईएस प्राथामिक विद्यालय वाशी, रेयॉन विद्यालय वाशी, आयईएस माध्यमिक विद्यालय वाशी, सेंट मेरीज्, तेजस्विनी विद्यालय, नमुंमपा शाळा क्र.९१, डिएव्ही विद्यालय, नमुंमपा शाळा क्र.७२ सेक्टर ५, –कोपरखैरणे, नमुंमपा शाळा क्र.३१ कोपरखैरणे, नमुंमपा शाळा क्र.८१ (ऊर्दू माध्यम) कोपरखैरणे, नमुंमपा शाळा क्र.१०९ (ऊर्दू माध्यम) कोपरखैरणे, नमुंमपा शाळा क्र.११५ कोपरखैरणे, नमुंम पा शाळा क्र.१०६ सेक्टर ५ कोपरखैरणे, आयसीएसई विद्यालय, रा.फ. नाईक प्राथमिक विद्यालय (इंग्रजी माध्यम), नमुंम पा हिंदी शाळा घणसोली, शेतकरी विद्यालय घणसोली, शेतकरी शिक्षण संस्थेचे प्राथमि क विद्यालय घणसोली, नमुंमपा शाळा क्र.४२ घणसोली, तळवली विद्यालय घणसोली, नमुंमपा शाळा क्र.४६ गोठवली, नमुंमपा शाळा क्र.४७ रबाळे, नमुंमपा शाळा क्र.९१ दिवा–ऐरोली, नमुंमपा शाळा क्र.१०३ माध्यमिक विद्यालय ऐरोली, ज्ञानदिप विद्यामंदिर ऐरोली, सुशिलादेवी देशमुख (इंग्रजी माध्यम) विद्यालय ऐरोली, श्रीराम विद्यालय आणि ज्युनियर कॉलेज ऐरोली, नमुंमपा शाळा क्र.४९ ऐरोली, नम ुंमपा शाळा क्र.७७ ऐरोली, नमुंमपा शाळा क्र.१०८ दिघा अशाप्रकारे बेलापूरपासून दिघ्यापर्यंत विविध शाळा महाविद्यालयांचा समावेश होता.

स्वच्छता ही सेवा अभियानांतर्गत राबविण्यात आलेल्या या प्लास्टिक संकलन विशेष मोहीमेला शाळा – महाविद्यालयांम धून उत्तम प्रतिसाद लाभला. या माध्यमातून विद्यार्थांच्या मनात संस्कारक्षम वयातच निसर्गाला हानीकारक प्लास्टिक वापराला प्रतिबंध करण्याचा व प्लास्टिक न वापरण्याचा संदेश रुजविला जात आहे.

# बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांच्या टपाल तिकीटाच्या प्रकाशनाला शासनाची मंजुरी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२०, चंद्रपूर :** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांना मोठे यश आले आहे. आमदार मुनगंटीवार यांनी घेतलेल्या पुढाकारामुळे विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे मानसपुत्र व आंबेडकरी चळवळीचे प्रभावी नेतृत्व करणारे बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त टपाल तिकीट प्रकाशित करण्याचा शासन निर्णय निर्गमीत करण्यात आला आहे.

सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी आ.मुनगंटीवार यांच्या प्रस्तावाला सकारात्मक प्रतिसाद देत डाक विभागाने तातडीने टपाल तिकीट प्रकाशित करावे, असे निर्देश त्यांनी दिले आहेत. राज्याचे माजी सांस्कृतिक कार्य मंत्री आ.मुनगंटीवार यांनी दिलेल्या प्रस्तावाला



विद्यमान सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी दोन दिवसांच्या आत मंजुरी दिली. त्यासंदर्भातील शासनादेश निर्गमित झाल्यावर मंत्री शेलार यांनी आ. मुनगंटीवार यांना व्यक्तिशः पत्राद्वारे ही बाब कळविली आहे, हे विशेष. बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे हे १९५८ ते १९८४ या कालावधीत राज्यसभेचे सदस्य होते, तर १९६९ ते १९७२ या कालावधीत राज्यसभेचे उपसभापती देखील होते. त्यांच्या कार्याचा गौरव होण्याच्या दृष्टीने जन्मशताब्दीच्या निमित्ताने टपाल तिकीट प्रकाशनाला प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे, असा शासन निर्देश दि. १७ सप्टेंबर २०२५ ला निर्गमित करण्यात आला आहे.

**आ. मुनगंटीवार यांच्याकडे निवेदन**

ब बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे मेमोरियल मल्टीपरपज सोसायटी, चंद्रपूरचे सचिव प्रतीक डोर्लीकर यांनी बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त टपाल तिकीट प्रकाशन संदर्भात आ. सुधीर मुनगंटीवार यांना विनंती केली होती. आ. मुनगंटीवार यांनी तातडीने या मागणीची दखल घेत सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांची मुंबई येथे भेट घेऊन निवेदन सादर केले. त्यानंतर दोन दिवसांच्या आत त्यावर अंमलबजावणी देखील करण्यात आली.

**बॅरिस्टर खोब्रागडे यांच्या मूल्यांना अभिवादन**

राज्य शासनाने टपाल तिकीट प्रकाशित करण्याचा घेतलेला निर्णय अत्यंत अभिमानास्पद आहे. हा निर्णय म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मानसपुत्र, विधीक्षेत्रातील विद्वान आणि आंबेडकरी चळवळीचे प्रभावी नेतृत्व बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांच्या सामाजिक न्यायाच्या लढ्याला व समतेच्या मूल्यांना एक सन्मानपूर्वक अभिवादन आहे, अशी भावना आ. मुनगंटीवार यांनी व्यक्त केली आहे.

या प्रकाशनाद्वारे त्यांच्या समतेच्या लढ्याला आणि सामाजिक न्यायासाठी केलेल्या अविरत व्रताला एक नम्र अभिवादन अर्पण केले जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# नवी मुंबईत समाविष्ट १४ गावांमध्ये पाणीपुरवठा, रस्ते, आरोग्य सुविधा, शाळेच्या कामांना तातडीने प्राधान्य द्यावे - उपमुख्यमंत्री शिंदे

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२०, नवी मुंबई :** महापालिकेत समाविष्ट १४ गावांमध्ये पाणीपुरवठा, रस्ते, आरोग्य सुविधा, शाळा ह्या कामांना तातडीने प्राधान्य द्या. या भागातील दप्तर हस्तांतरणाची कार्यवाही त्वरीत पूर्ण करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नवी मुंबई महापालिका आयुक्तांना दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे नवी मुंबई मनोपा हद्दीत समाविष्ट झालेल्या १४ गावांच्या विविध मागण्यां बाबत बैठक झाली. त्यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते. यावेळी खासदार डॉ.श्रीकांत शिंदे, आमदार राजेश मोरे, उपमुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव गोविंदराज, नवी मुंबई म हापालिका आयुक्त कैलास शिंदे, ठाणे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ आदी उपस्थित होते. या गावांमध्ये तातडीने मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नवी मुंबई महापालिकेने कार्यवाहीला वेग द्यावा.

तात्पुरती आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पोर्टा केबिनच्या सहाय्याने दवाखाने सुरू करण्यात यावे. नावाळी येथे असलेल्या जुन्या इमारतीमध्ये नव्याने रुग्णालय सुरू करण्यासाठी संबंधिताना निर्देश द्यावे, असे उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. वाकळण येथील तलावाचे सुशोभीकरण करून महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांमार्फत या गावांमधील साफसफाई करण्यात यावी. शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे तातडीने हटविण्यात यावे. तसेच या गावांमधील शासकीय दप्तर नवी मुंबईकडे हस्तांतरीत करण्याच्या प्रक्रियेला वेग देण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिले.

या गावांचा नियोजन आराखडा तयार करण्याचे काम सुरू असून रस्ते, पायाभूत सुविधा, जमिनीचा उपयोग आदी घटकांचे सर्वेक्षण ड्रोनच्या माध्यमातून करण्यात येत असल्याचे आयुक्त शिंदे यांनी सांगितले. नवी मुंबई महापालिकेच्या २०२५–२६ च्या अर्थसंकल्पात या १४ गावांसाठी १९ कोटी ७० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली असून त्यामध्ये प्राधान्याने शाळा, आरोग्य केंद्र, पाणी पुरवठा, मलनिस्सारण, पायवाटा, रस्ते या सुविधाचा समावेश असल्याचे आयुक्तांनी सांगितले.

# थोडक्यात

## मनमाड रेल्वे स्टेशन परिसरात वन्यप्राण्याच्या कातडीसह ४ जणांना अटक




## वन विभागाची धडक कारवाई

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२०, विंचूर (नाशिक) :** डब्ल्यूसीसीबी मुंबई कडून मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे मनमाड रेल्वे स्टेशन परिसरात वन विभागाने सापळा रचून मोठी कारवाई केली. दिनांक १९ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजेच्या सुमारास चार आरोपींना वन्यप्राण्याच्या (हरिण) कातडीसह ताब्यात घेण्यात आले.

**अटक करण्यात आलेले संशयित आरोपी असे –**

१) दिपक सुरेश चव्हाण (वय ३९, रा. हेक्कलवाडी, ता.धुळे, जि.धुळे)
२) प्रवीण रमेश बनसोड (रा. वर्धा, ता. वर्धा, जि. वर्धा)
३) मारुती लक्ष्मण उईके (रा. ढाकूलगाव, ता. धामणगाव, जि. अमरावती)
४) अभिलाल अर्जुन पाटील (रा. सडगाव, ता. धुळे, जि. धुळे)

वरील सर्व आरोपींवर भारतीय वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ अंतर्गत वन्यप्राण्याच्या कातडीच्या तस्करीचा गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे. सदर कारवाई ही उपवन संरक्षक पूर्व विभाग नाशिक राकेश सेपट, सहाय्यक वनसंरक्षक (वनीकरण व वन्यजीव संरक्षक) मनमाड स्थित चांदवड शिवाजी सहाने यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरीक्षक क्षेत्र अधिकारी येवला (प्रा.) राहुल घुगे यांनी केली. या कारवाईत वनपाल जयप्रकाश शिरसाठ (मनमाड), वनरक्षक विजय दोंदे, अमोल पाटील, विष्णू राठोड, संजय बेडवाल, विजय टेकनर, संतोष दराडे, पंकज नागपुरे, सोनाली वाघ, वंदना खरात, वाहनचालक सुनील भूरूक आदी वनकर्मचारी यांनी सक्रिय सहभाग घेतला. पुढील तपास सुरू आहे.

## स्व.खिलारे यांच्या पुण्यतिथीनिमित्त मातोश्री वृद्धाश्रमात फळे, मिष्टान्न भोजन




**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२०, पंढरपूर :** स्व.सर्जेराव आण्णा खिलारे यांनी सामाजिक क्षेत्रामध्ये काम करत असताना आपल्या कुटुंबाची पर्वा न करता सर्व गोर–गरीब बहुजन, समाजातील घटक एकत्र घेऊन तळागाळातील कार्यकर्त्यांना आपल्या सोबत घेऊन काम करणे, त्यांचा सर्व क्षेत्रांमध्ये मोठा खारीचा वाटा होता. भाऊची समाजाप्रती तळमळीने काम करण्याची आवड होती. त्यांना असे वाटे की समाजातील सर्व लहान मुलांपासून ते तरुणांनी मोठे व्हावे आणि आपल्या आई–वडिलांचे, गावाचे नांव उज्ज्वल करावे. स्वः सर्जेराव खिलारे यांनी शेती च्च्या माध्यमातून काम करत असताना सामाजिक बांधिलकी जपत होते. स्व.सर्जेराव भाऊचा स्वभाव मनमिळावू व सर्वांशी हसत खेळत प्रामाणिकपणे आपले विचार सर्व समाजापर्यंत पोहोचवण्याची काम करत. स्वः सर्जे राव आण्णा खिलारे यांच्या द्वितीय पुण्यतिथीनिमित्त मातोश्री वृद्धाश्रम गोपाळपूर, बिईंग ह्युमन बेवारस सामाजिक संस्था गादेगाव येथे फळे वाटप अन्नभोजन असे विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते. या पत्रकार सचिन कुलकर्णी पत्रकार तानाजी जाधव पत्रकार नामदेव लकडे अजित देशपांडे कल्याण कुलकर्णी आदी मान्यवर कार्यक्रम ासाठी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून भाऊच्या प्रतिमेस अभिवादन केले. यावेळी भाऊना अभिवादन करताना उपस्थित सजाबाई खिलारे, राजेश सर्जेराव खिलारे, सुवर्णा राजेश खिलारे, आकाश राजेश खिलारे, नवनाथ सर्जेराव खिलारे, अमित नवनाथ खिलारे, सुमित नवनाथ खिलारे, समीक्षा नवनाथ खिलारे, नाईक नवरे परिवार, खिलारे परिवार, वाघमारे परिवार, खंडागळे परिवार, खिलारे तसेच बहुसंख्येने महिला वर्ग उपस्थित होता. सदर कार्यक्रमांच्य आयोजनासाठी अमित खिलारे यांनी अथक परिश्रम घेतले.

## पत्रकार हुकमत मुलाणी यांचे दुःखद निधन




**अक्षराज : विकास वाघ**

**दि२०, धाराशिव :** टुडे समाचारचे संपादक हुकमत हमीद मुलाणी रा. कोंड (वय ४७ वर्षे) यांचे दि.२० सप्टेंबर रोजी पहाटे हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर कोंड येथील कब्रस्तानमध्ये अत्यंत शोकाकुल वातावरणात दफनविधी करण्यात आला. यावेळी सर्व पत्रकार, लोकप्रतिनिधी, राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते, प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी, नातेवाईक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पत्नी, चार मुली, एक मुलगा, सून, नातवंडे, आई, वडील, बहिण व भाऊ असा मोठा परिवार आहे.

त्यांनी अतिशय खडतर प्रवासातून आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून सर्व समाज घटकांना न्याय मिळवून देण्याचे काम केले.

त्यांचा स्पष्ट वक्तेपणा, निर्भिडवाणी व कोणताही मुलाहिजा न ठेवता म ांडण्याची कला त्यांच्या बातमीत ठासून भरलेली असल्यामुळे अनेकजणांना भुरळ घातली होती. त्यांची पत्रकारिता फुलत असतानाच निसर्गाचा हा दुर्दैवी आघात सर्व पत्रकार आणि त्यांच्या पत्रकारितेला हुरहूरी लावणार आहे. त्यांच्या आकस्मित निधनाने हरहुन्नरी पत्रकार विशेषतः ग्रामीण भागातून ज्या प्रकारे म ांडणी करणे आवश्यक होते, अगदी तशीच मांडणी करणारा पत्रकार अचानकपणे कायमचाच निघून गेला आहे. त्यांच्या आकस्मित निधनाने सर्व स्तरातून हळहळ व्यक्त होत आहे.